# <u>जाहीर सूचना</u>

## आयडॉलची मान्यता रद्द केली नाही मान्यतेची प्रक्रिया सुरु आहे

नुकत्याच प्रसारमाध्यमांमध्ये व वृत्तपत्रांमध्ये दूर व मुक्त अध्ययन संस्थेला (आयडॉलला) मान्यता नाही अशा आशयाच्या बातम्या प्रसिध्द झाल्या आहेत. प्रत्यक्षात या बातम्या अर्धवट माहितीच्या आधारावर आहेत. आयडॉलची (मुंबई विद्यापीठ) मान्यता विद्यापीठ अनुदान आयोगाने रद्द केलेली नसून अद्यापही मान्यतेची प्रक्रिया सुरु आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने जून २०१७ मध्ये दूरस्थ शिक्षणासाठी नवीन नियमावली जाहीर केली यानुसार भारतातील प्रत्येक दूरस्थ शिक्षण संस्थेला विद्यापीठ अनुदान आयोगाची स्वतंत्रपणे मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने ६ सप्टेंबर २०१८ रोजी दूरस्थ शिक्षणाच्या नियमामध्ये तिसरी सुधारणा केली. यामध्ये नॅकसाठी विद्यापीठांना शिथिलता देण्यात आली. त्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१९-२० संपेपर्यंत नॅक करणेसाठी मुभा मिळाली . यानुसार आयडॉलने मान्यतेसाठी पुन्हा नवीन प्रस्ताव ५ ऑक्टोबर, २०१८ रोजी यूजीसीकडे सादर केलेला आहे. सदर प्रस्तावाची छाननी करण्याचे काम सुरु असून लवकरच यूजीसीचे यासंदर्भात उत्तर अपेक्षित आहे.

त्यामुळे मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेची मान्यता रद्द केलेली नसून मान्यतेची प्रक्रिया सुरु आहे.

दिनांक : ४ डिसेंबर २०१८ प्रभारी संचालक